ऐक्य

९१ वर्षांची वाचनीय परंपरा

: www.dainikaikya.com सातारा शनिवार दि. ९/१/२०१६ email : news@dainikaik

D. P. BHOS...

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव



मार्गदर्शन करताना सचिन जवळकोटे, शेजारी प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत व पत्रकार.

# तंत्रज्ञानाबरोबर पत्रकारांनी बदलावे : सचिन जवळकोटे

▲ **कोरेगाव**, दि. ८ : नवनवीन तंत्रज्ञानामुळे वृत्तपत्र क्षेत्रातील प्रवाह बदलत आहे. त्यामुळे पत्रकारांनीदेखील बदलायला हवे. वृत्तपत्रातील बातमीचे महत्त्व अजूनही टिकून आहे, असे प्रतिपादन पत्रकार सचिन जवळकोटे यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या डी. पी. भोसले कॉलेजमध्ये मराठी विभाग व जिल्हा माहिती कार्यालय यांच्याबतीने झालेल्या पत्रकार दिन कार्यक्रमात ते बोलत होते. प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत अध्यक्षस्थानी होते. जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत सातपुते यांची प्रमुख उपस्थिती होती.

जवळकोटे म्हणाले, बातमीनंतरची बातमी तयार करण्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये पत्रकारांनी आत्मसात करण्याची गरज आहे. वृत्तपत्रातील बातमीचे महत्त्व आजही टिकून आहे. नि:स्वार्थ भावनेने व ताकदीने पत्रकारिता करावी. पत्रकारितेत व्याकरण व भाषेवर प्रभुत्व हवे. अवांतर वाचन असावे. पत्रकाराला शब्द झेलता व उधळता यायला हवेत.

प्रशांत सातपुते म्हणाले, जग झपाट्याने बदलत असून वाचक जागरूक झाला आहे. बातमीत सत्यता महत्त्वाची आहे. शब्दभांडार समृद्ध असेल तर पत्रकारांना माणसे अनुभवता, वाचता व जाणता येतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आज पत्रकारितेच्या माध्यमातून संधी उपलब्ध आहेत. शासनाच्या केंद्रीय, राज्य व विद्यापीठ स्तरावरील उच्चपदे बऱ्याच अंशी रिक्त आहेत. पत्रकारितेत झोकून दिल्यास यश निश्चित असते.

प्राचार्य डॉ. सावंत म्हणाले, वृत्तपत्र म्हणजे लोकशाहीचा चौथा स्तंभ असून पत्रकार समाजाच्या विविध प्रश्नांकडे डोळसपणे पाहून ते बातमीच्या माध्यमातून सोडवण्याचा प्रयत्न करतात. पत्रकार हे समाजसेवकाची भूमिका पार पाडत आहेत.

गणेश बोतालजी यांनी मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुणे व कोरेगाव तालुका मराठी पत्रकार संघाच्या सदस्यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. डॉ. बाळासाहेब चव्हाण यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. विद्या मावडकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डी. बी. पवार यांनी आभार मानले.